# संग्रहालयात नैसर्गिक जगाचा अनुभव घ्या

1


तुम्हाला मी शिल्प दालनाच्या प्रवेशद्वाराजवळ दिसेन. माझ्या समोरच असलेल्या भगवान शिवाचे मी वाहन आहे. माहिती पत्रक वाचून, मला कधी निर्माण केले आणि मी कुठे सापडलो, ते लिहा.



2


डावीकडे वळून शिल्प दालनाच्या आत पुढे डावीकडे जा आणि तुम्हाला गर्जना करणारी दोन सिंहांची शिल्पे दिसतील. या क्रूर प्राण्यांना लिओग्रिफ म्हणतात आणि त्यांची शारीरिक वैशिष्ट्ये ग्रिफिन (एक पौराणिक प्राणी ) आणि इतर प्राण्यांचे मिश्रण आहेत.


आता स्वतःचा एक प्राणी तयार करा! तुम्ही त्या प्राण्याला कोणत्या प्रकारचे पंख, पंजे आणि इतर वैशिष्ट्ये द्याल?



3

शिल्प दालनातून बाहेर आल्यावर उजवीकडे वळा. पिंपळाच्या झाडाखाली बसलेले बुद्धाचे छोटे शिल्प शोधा, याच बोधी वृक्षाखाली त्यांनी आपले पहिले प्रवचन दिले. कमळ, चक्र आणि हत्तीसह हा वृक्ष हे भगवान बुद्धांचे महत्त्वाचे प्रतीक आहेत. तुम्हाला दालनात इतर वस्तूंवर ही चिन्हे सापडतील का?






4

जिन्याने पहिल्या मजल्यावर जाऊन भारतीय लघु चित्रकलेच्या दालनात प्रवेश करा . फांद्यावर बसलेल्या ससाण्याचे लघु चित्र पहा. बहिरी ससाणा (पेरेग्रीन फाल्कन) हा मुघल सम्राट जहांगीरचा प्रिय होता. हे चित्र जहांगीरला त्यांच्या दरबारातील उस्ताद मन्सूर या चित्रकाराने बनवून दिले होते. आता तुमच्या आवडत्या पक्ष्याची वैशिष्ट्ये लिहा .



**शोधकांचे नाव**



## 5

भारतीय लघु चित्रकला दालनापासून समोरच्या भारतीय सजावटी कला दालनाकडे जाऊया. दालनाच्या आत चालत तुम्हाला हस्तिदंतापासून बनविलेला, बारुद्दान दिसेल. हा उडी मारणाऱ्या मृगाच्या आकाराचा बारुद्दान आहे. मृगाचे ओठ, उघडे डोळे आणि मृगाच्या शिंगाकडे लक्ष द्या, हे मृग कदाचित शिकाऱ्यांपासून पळून जात आहेत.

दालनात फिरा आणि तुम्हाला दिसत असलेल्या वस्तूंवर टिक करा

- [ ] एक जेडचा वाडग
- [ ] एक तलवार
- [ ] देवाचे कांस्य शिल्प
- [ ] हस्तिदंती दागिन्यांची पेटी
- [ ] तांब्याचा वाडगा
- [ ] हत्तीच्या पाठीवरील हौदा




## 6

आता मुद्रा दालनात जाऊया. तेही पहिल्या मजल्यावर आहे. प्रिंट्स दालनातून चालत जाऊया, समोरच्या विभागात प्रवेश करा. विविध प्रकारच्या नाण्यांकडे लक्ष द्या. नाण्यांवर तुम्हाला दिसणाऱ्या विविध प्राण्यांची चित्रे काढा.



## 7

आता जवळच आलो आहोत! शेजारच्या आभूषण दालनात जाऊया. निसर्गाने प्रेरित विविध प्रकारच्या दागिन्यांवर लक्ष ठेवा, विशेषत: पांढरा हार आणि कानातले. हे दागिने माशांची खवले आणि दगडांपासून बनविले जाते. निसर्गापासून प्रेरित दागिने स्वत: तयार करा.



## 8

आता बाहेरील बागेकडून बाल वस्तूसंग्रहालयकडे जाऊया. बाओबाबचे (गोरख चिंच) झाड पहा. त्याला उलटे झाड का म्हणले जाते तुम्ही सांगू शकाल का? कारण त्याचे खोड चित्रकलेच्या पासून झाडाच्या वरच्या आकारापेक्षा रुंद आहे. झाडाखाली विसावा घ्या आणि त्याच्या सावलीचे चित्र काढा.

